CRITERION 3

# 3.3- Research Publication and Awards

**3.3.2.1**

***Research Papers***

# PAPERS IN UGC APPROVED JOURNALS

Dr. M.N.Gosavi

27 August, 2016
Special Issue: I

ISSN: 2319-3689

# Critical Space®

A Peer-reviewed (refereed) International Journal
in Language, Literature and Culture

## Special Issue

on

# Impact of Globalization on Human Rights

Editor
**Dr. H. B. Patil**

Guest Editor
**Nutan Patil**

27. Right to Education as A Fundamental Human Right – Indian perspective
*Avishkar D Kamble*
........187

28. मानवी हक्क आणि महिला सबलीकरण
डॉ. संगीता संपत पाटील
........191

29. जागतिकीकरणानंतरची इतर वर्गाची लिंगाधिष्ठित समानतेकडील वाटचाल
डॉ. मधुकर नारायण गोसावी
........197

30. मानवी हक्क व समानता
प्रभा सयाजीराव घोरपडे
........205

31. भारतातील मानव अधिकार व लिंगभेद
डॉ. अनघा पाठक
........211

32. बालकांचे हक्क आणि बालमजुरी – एक चिकित्सक अभ्यास
प्रा. बळवंतराव कुंडलिक जाधव
........217

33. लिंग समानता
प्रा. लक्ष्मी विष्णु भंडारे
........227

34. मानवी हक्क व बालकामगार
डॉ.डी. के. मोरे व डॉ.जयश्री चव्हाण
........231

35. जागतिकीकरणाचा मानवी हक्कांवर होणारा परिणाम
उज्वला रघुनाथ बंडगर व प्राचार्य डॉ. एम.ए. पाटील
........241

36. विकसनशील भारतातील बालमजूरीचा प्रश्न आणि मानवी हक्क : एक अभ्यास
प्रा. जालींदर आनंदराव यादव
........245

37. शालेय पाठ्यपुस्तकातून लिंगसमभाव दृष्टीकोन
डॉ. रेखा टोपकर
........255

38. मानवी हक्क आणि मानवी संसाधन विकासातील संस्थांचा : एक अभ्यास
प्रा. एस. के. नामदास
........259

# जागतिकीकरणानंतरची इतर वर्गाची लिंगाधिष्ठित समानतेकडील वाटचाल

डॉ. मधुकर नारायण गोसावी*

**प्रस्तावना :**

केवळ भारतातच नव्हे तर जगभरातच फार पुरातन काळापासून लिंगाधिष्ठित विषमता अस्तित्वात असल्याचे आढळून येते. भारताच्या संदर्भात विचार केल्यास इसवी सन पूर्व ४००–५०० शतकात सतपत ब्राह्मण या ग्रंथामध्ये नपुसंक म्हणून उल्लेख सापडतो. तर इ.स. पूर्व २०० मधील नाट्यशास्त्रात आम्ही पुरूषही नाही व स्त्रीही नाही असा उल्लेख सापडतो. अशा प्रकारच्या जे पुरूषही नाहीत व स्त्रीही नाहीत त्यांना भारत, पाकिस्तान आणि बांगला देशात हिजडा म्हणून संबोधले जाते. मानवाधिकारासंदर्भात जेव्हा तृतीयपंथीयांचा विचार केला जातो तेव्हा त्याचे अस्तित्वच नाकारले गेले होते. भारतीय ग्रंथामध्ये तर या अशा तृतीयपंथीयांच्या विचारावर हसावे की रडावे तेच कळत नाही. पाश्चात्य राष्ट्रामधील मूर्ख लोक तृतीय लिंगाची व्याख्या करण्यासाठी संघर्ष करत आहेत याला काय म्हणावे? अशा प्रकारची नकारात्मक विचारधारा आढळून येते. परंतु समाज परिवर्तनशील असतो. स्थितीशील कधीही नसतो. बदल हा त्याचा स्वभावधर्म आहे. त्यानुसार अनेक बदल होत गेले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात युनियन ऑफ सोव्हिएत स्पेशालिस्ट रिपब्लिक (USSR) मधील गोर्बाचोव्ह यांच्या कालखंडात ग्लासनोत आणि पेरेस्त्रोइका या शब्दांचा जास्त प्रमाणात वापर करण्यात आला. त्यातूनच रशियामधील समाजवादी अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून आला. साहजिकच जगात सुध्दा या बदलांचे वारे वाहू लागले आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेत जसे शोषण होते तसेच समाजवादी अर्थव्यवस्थेत सुध्दा शोषण होऊ शकते आणि मानवाधिकारांचा संकोच होतो. असा विचार जगात पसरला आणि त्यातून मानवाधिकाराचे व्यापक लढे जगभर पसरलेले दिसतात.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

१. लिंगाधिष्ठित विषमतेवर आधारलेल्या इतर वर्गाचा अभ्यास करणे.

२. लिंगभेदामुळे इतर वर्गाला समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीचा अभ्यास करणे.

३. लिंगभेद व मानवाधिकारापासूनची वंचितता यांचा शोध घेणे.

* सहयोगी प्राध्यापक नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

ISSN - 2278-9308

# करुणेच्या तत्त्वज्ञानाचा दारिद्र्यावरील होणारा परिणाम

**डॉ. मधुकर नारायण गोसावी**
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स,कोल्हापूर

COMMERCE ★ NIGHT COLLEGE OF ARTS & KOLHAPUR

**गोषवारा -**

या शोधनिबंधामध्ये दारिद्र्यावर परिणाम करणारे जे विविध, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटक आहेत त्याचप्रमाणे ज्याला अध्यात्माची किनार आहे असे काही प्रभावी घटक आहेत. त्यापैकी असाच एक करुणा हा घटक आहे. त्याचा दारिद्र्यावर काय परिणाम होतो याचा अभ्यास करण्यात आला आहे. एका विशिष्ट पातळीपर्यंतच करुणा ही माणसाच्या विकासाला पोषक ठरते. अन्यथा ती विकासाऐवजी समाजाला निष्क्रियतेकडे, आळशी नतग्गाकडे घेऊन जाण्याची शक्यता असते. करुणेचा आधार हा प्रामुख्याने अध्यात्मिक व धार्मिक असतो, समाजातील एका विशिष्ट वर्गाला दान करण्यामध्ये आनंद व समाधान वाटते. मात्र बाबा आमटेंसारख्या कर्मयोग्याला वाटते की दान माणसाला नादान बनवते. करुणेचे तत्त्वज्ञान लाचारांचे तांडे निर्माण करते, स्वाभिमानी समाज निर्माण करु शकत नाही. त्यामुळे कारुण्याचे तत्त्वज्ञान आणि दारिद्र्य यांचे अतिशय जवळचे नाते आहे. कल्याणकारी राज्याच्या मुलभूत तत्त्वांमध्ये देखील करुणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र ती मानवाच्या उत्थानाला मदत करणारी ठरावी अध:पतनाला नव्हे.

**प्रस्तावना -**

भारताला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्षे झाली तरीही अजून आपण आपल्या मुलभूत नैसर्गिक गरजा पूर्ण करु शकलो नाही. आर्थिक गरजा पूर्ण करण्यापासून तर अजून आपण खूपच लांब आहोत. बहुतांश विचारवंत, सामान्य नागरिक, विविध राजकीय पक्ष, प्रामुख्याने विरोधी पक्ष, स्वयंसेवी संघटना हे समाजातील विविध घटक. भारतातील दारिद्र्याला सत्ताधारी राजकीय पक्ष आहे तोच प्रामुख्याने जबाबदार आहे, असे मानतात. परंतु भारतातील समाजव्यवस्थेत व अर्थव्यवस्थेत इतकी गुंतागुंतीची परिस्थिती आहे की अपयशाचे खापर केवळ सत्ताधारी राजकीय पक्षावर फोडून चालणार नाही. दारिद्र्यासाठी प्रमुख जबाबदारी त्यांची आहेच पण एकमेव त्याला दोष देऊन भागणारे नाही. त्याबरोबरच इतर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व भौगोलिक घटकही जबाबदार आहेत. त्यातूनच आपणास राजकीय घटक व करुणा, सामाजिक घटक व करुणा, सांस्कृतिक घटक व करुणा, धार्मिक घटक व करुणा अशा विविध घटकांचा अभ्यास करता येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१. भारतातील दारिद्र्य घालविण्यासाठी प्रयत्न करणे.
२. दारिद्र्यावर परिणाम करणाऱ्या अध्यात्मिक घटकांचा अभ्यास करणे.
३. करुणेच्या तत्त्वज्ञानाचा दारिद्र्यावरील परिणाम अभ्यासणे.
४. करुणेच्या उत्पादनक्षमतेवरील परिणाम अभ्यासणे.
५. आपण दरिद्री आहोत हे भूषणावह वाटते काय या संदर्भातील मानसिकतेचा अभ्यास करणे.
६.

COMMERCE * NIGHT COLLEGE OF ARTS & KOLHAPUR

ISSN - 2278-9308

**संशोधन पध्दती -**

हा शोधनिबंध प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीवर आधारलेला आहे. परंतु त्याबरोबरच प्राथमिक साधनसामग्रीचा सुध्दा वापर करण्यात आला आहे. अनेक पिवळे कार्डधारकांच्या भेटी घेऊन त्यांच्या मानसिकतेचा शोध व त्याचा होणारा परिणाम याचा अभ्यास करण्यात आला आहे. दुय्यम साधनसामुग्रीमध्ये ज्या ज्या कार्यकर्त्यांनी तळागाळातील समाजासाठी त्यांच्या उत्थानासाठी प्रयत्न केले त्यांच्या साहित्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

**करुणेचा धार्मिक आधार व दारिद्रय -**

प्रामुख्याने बहुतांश धर्मांचा एक मुलभूत आधार हा करुणाच दिसतो. गरीबाला अन्न द्यावे किंवा भुकेल्याला अन्न द्यावे. तहानलेल्याला पाणी द्यावे, निराश्रिताला आश्रय द्यावा. अशा प्रकारचे तत्त्वज्ञान आपणास धर्मग्रंथामध्ये आढळून येते. दुबळया मानव समाजाला जगण्याची प्रेरणा देण्यासाठी धर्माची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. त्यांनी बुध्द धम्माचा पुरस्कार केला. धर्माऐवजी त्यांनी धम्म हा शब्द वापरला. त्यांच्या मते धर्म हा बंदिस्त असतो तर धम्म हा परिवर्तनीय असतो. मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत जे काही आहे ते अखेरचे असा विचार धम्माच्या बाबतीत नसतो. धर्मग्रंथातील शब्द हा अखेरचा आहे. त्यात बदल केला तर तो पाखंडी होतो, काफिर होतो. अशा प्रकारचा विचार धम्मात अभिप्रेत नाही. त्यामुळे प्रज्ञा, शील आणि करुणा हे या धर्माचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. बौध्द धर्मात अतिशय गांजलेल्या दलित वर्गासाठी करुणा हा एक मोठा आधार होता. आयुष्यभर जन्मापासून ते मरणापर्यंत हेटाळणी, दु:स्वास याच्याशिवाय काहीही वाटयाला न आलेल्या समाजासाठी तितकाच तो आशेचा किरण होता. जखमेवर मारलेली फुंकर होती. आयुष्यभर शारीरिक व मानसिक पातळीवर उच्च जातीचा व वर्गीय लोकांनी जखमा करुन त्यावर मीठ चोळण्याच्या प्रकारातून क्षणभर का होईना तो विसावा होता.

परंतु करुणा हा केवळ तात्कालिक विसावा होता. परंतु त्यातून कायमस्वरुपी दारिद्रय नष्ट होईल अशा प्रकारची भाबडी कल्पना डॉ. आंबेडकर यांची नव्हती. म्हणून उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये, राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्यामध्ये शोषितांना स्थान मिळावे, वाटा मिळावा, संधी मिळावी असे त्यांना वाटे. त्यातूनच आज आपणास केवळ मेहरबानीच्या, कोरडया सहानुभूतीच्या मागे न लागता, प्रयत्नांनी, अथक श्रमांनी ज्या ज्या लोकांनी अतोनात मेहनत घेतली, कष्ट घेतले, शुन्यातून आयुष्य घडविले, उभे केले आज निश्चितच ते पिवळया कार्डासाठी धडपडत नाहीत तर त्यांच्याजवळही दारिद्रय मुक्तीचे पांढरे कार्ड आले आहे. श्वेतवर्णाची शिधापत्रिका त्यांच्या वाटयावर आली आहे. भले त्याच्यावर काही धान्य, वस्तू मिळो न मिळो परंतु त्यांचा आर्थिक दर्जा निश्चितच उंचावला आहे.

**कारुण्याचे तत्त्वज्ञान आणि दारिद्रय -**

महात्मा ज्योतिबा फुले आपल्या अखंडामध्ये म्हणतात, "मानवांनो तुम्ही ईशा नित्य ध्यावे || सर्व सुखी व्हावे || ज्योती म्हणजे मानवाचा धर्म एकच असावा || सत्याने वर्तावा || ज्योती म्हणे. ज्योतिबा कोणीतरी निर्मिक मानतात तोच ईश्वर मानतात. त्याचीच केवळ भिती असावी आणि मानवाचा केवळ एकच धर्म आणि तो म्हणजे सार्वजनिक सत्यधर्म त्या सत्यधर्मांचा सारांश म्हणजे शोषणमुक्त समाजाची निर्मिती. सर्व धर्मभेद, जातीभेद या संदर्भात ते म्हणतात खिस्त महंमद मांग ब्राह्मणासी ग धरावे पोटाशी

ISSN - 2278-9308

बंधूपरी मानव भावंडे सर्व एकसहा || त्यायमध्ये आहात तुम्ही सर्वही बुध्दी सामर्थ्याने सुख द्यावे घ्यावे || दीनास पाळावे || ज्योती म्हणे || यामध्ये ज्योतिबांनी मांडलेले करुणेचे तत्त्वज्ञान फारच उच्च दर्जाचे आहे. ख्रिश्चन व मुस्लिम यांच्या बाबतीतही ते भेदभाव करीत नाहीत. इतकेच नव्हे तर ब्राह्मणांनी इतके सामाजिक, मानसिक, आर्थिक, शारीरिक शोषण करुनही ते जातीच्या विरुध्द बोलत नाहीत. केवळ प्रवृत्तीच्या विरुध्द बोलतात. शूद्रांच्या संदर्भात त्यांना कणव आहेच. परंतु ब्राह्मणांसंदर्भात त्यांच्या मनात सूडबुध्दी नाही. म्हणून ते म्हणतात मांग आणि ब्राह्मणांना पोटाशी धरावे. जवळ करावे. हेटाळणी करु नये. मात्र त्याबरोबरच ते ठणकावतात मुढ मांगासह ब्राह्म मुजोर || मूळ सत्य सार त्यास सांगा || म्हणजेच कुणीही मुजोर झाले तर त्याला वठणीवर आणा आणि मानवतेची जाणीव करुन द्या. सत्य वर्तनाने सर्व सुखी होती || आर्य झूरताती || मनी सर्व || कष्टाळू स्वभाव ब्राह्मणांचा नाही || भांबावून पाही शूद्राकडे || भोंदलू स्वभाव मुळीच जाईना || योजी फितुरांना सर्व कामी || कष्टकरी करा तेशा ऐदी भटा || उपटावा कांटा || ज्योती म्हणे.

कारुण्याचे तत्त्वज्ञान व दारिद्रय यांचा विचार करीत असतांना हा अखंड अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे. कष्टाळू स्वभाव ब्राह्मणांचा नाही तेंव्हा अशाच प्रकारची लागण दारिद्री माणसास होऊ नये. अन्यथा शूद्रांना देखील किंवा गरीबांना देखील ते आळशी बनतील इतपत कोणतीही मदत करता कामा नये असे आपणास म्हणता येईल. कुणीही भोंदून खाऊ नये अशा प्रकारची समाजव्यवस्था निर्माण करणे हा कारुण्याच्या तत्त्वज्ञानावर मदत करीत असताना विचार करणे महत्त्वाचे आहे.

**कल्याणकारी राज्याची संकल्पना आणि दारिद्रय -**

कल्याणकारी राज्याची संकल्पनाच मुळी करुणेच्या तत्त्वज्ञानातून जन्माला आली आहे. डार्विनच्या सिध्दांताप्रमाणे जे सबळ असतात ते टिकतात व जे दुबळे असतात ते नष्ट होतात. या सिध्दांताप्रमाणे जग चालल्यास, जगाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय व्यवहार चालल्यास दुबळयांचे जगणे अधिक दयनिय होईल. किंबहुना ते कठीण होईल. शेवटी ते अशक्य होईल.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण बघितल्यास आज आपणाला अशीच परिस्थिती दिसत आहे. नुसत्याच कोरडया सहानुभूतीने शेतकऱ्यांचा मुलभूत प्रश्न सुटणार नाही. डॉ. बाबा आमटे यांच्या म्हणण्याप्रमाणे भान ठेवून योजना आखल्या पाहिजेत आणि बेभान होऊन त्या राबविल्या पाहिजेत. कल्याणकारी राज्याची महत्त्वाची जबाबदारी आहे ती म्हणजे श्रमाला सामर्थ्य देण्याची. श्रम दुबळे झाले की श्रमिक दुबळा होतो. श्रमाची किंमत कमी झाली की श्रमिकांची किंमत कमी होते. १०० फूट विहीर खोल खणून पाणी लावणारा श्रमिक आणि ते पाणी शुध्द करुन बाटल्यात भरणारा श्रमिक. दोघांच्या श्रमाचे मुल्यात प्रचंड तफावत आहे. विहीर खणणाऱ्याच्या श्रमाला मोल नाही, तर बाटलीबंद पाण्याला किंमत आहे. साहजिकच त्यात काम करणाऱ्याला त्याच्या श्रमाला मोल आहे.

गाईला वैरण, पाणी, दान, ढेप इत्यादी विविध खाद्य घालून मिळणारे दूध १८रु. लिटर तर पाणी बाटलीबंद होण्यासाठी लागणारे श्रम, भांडवल आणि त्याला मिळणारी किंमत १८ रु. लिटर. तेंव्हा कल्याणकारी राज्यात यांचा मेळ कसा बसणार ? उत्पादन खर्च आणि मिळणारा परतावा यांचा मेळ कसा घालणार ? प्रचंड वाढणाऱ्या आदानांच्या किंमती आणि मागणी पुरवठयाच्या असंतुलनात ढासळत जाणाऱ्या, नुसत्याच ढासळत जाणाऱ्या नव्हे. तर सातत्याने ढासळत जाणाऱ्या उत्पादनांच्या किंमती

ISSN - 2278-9308

यांच्यातील प्रचंड तफावतीत शेतकरी खचत चालला आहे. त्याच्याजवळ पिवळे कार्ड नाही. सरकारचे कल्याणकारी राज्य त्याच्यासाठी नाही. त्याला शेतीसाठी पाणी पाहिजे ते देण्याची सरकारची इच्छा नाही. सरकारी इच्छा फक्त पैसा खर्च करण्याची आहे. पैसा खर्च होईल परंतु त्याला पाणी मिळणार नाही अशी तजवीज सरकार करीत आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो ते दुःखाकडे तुच्छतेने पाहते, करुणेचा धिक्कार करते. आपली सत्ता अबाधित रहावी एवढीच करुणा तो दाखवतो. आपली राजकीय सत्ता गमावलेल्या पक्षाचे एक नेते म्हणत होते . लोकांना आम्ही मदत केली ती चूकच झाली. म्हणजेच मदत केली नसती तर पुन्हा आमची सत्ता आली असती. त्यातूनच त्यांची कल्याणकारी राज्याची संकल्पना किती फसवी आहे हे स्पष्ट होते.

एकदा ऑस्ट्रेलियाचे शिष्ट मंडळ आनंदवनात भेट देण्यासाठी आले होते. तेंव्हा ते बाबा आमटे यांना म्हणाले की, आम्ही तुमच्या आश्रमासाठी गहू देऊ इच्छितो तेंव्हा तुम्हाला किती गहू पाहिजे ते सांगा. बाबा म्हणाले, तुमचा गहू संपला की इथली शांतता संपली. जोपर्यंत तुम्ही दिलेला गहू शिल्लक आहे तोपर्यंत इथे शांतता आहे. त्यामुळे गहू पिकविण्याचे तंत्रज्ञान द्या. हा विचार कल्याणकारी राज्याच्या निर्मितीतून दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी किती महत्त्वाचा आहे हे स्पष्ट होते.

**गरीबांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजना -**

कल्याणकारी राज्याचे एक महत्त्वाचे काम म्हणजे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या जे दुर्बल आहेत तसेच आर्थिक दृष्ट्या जे कमकुवत आहेत त्यांच्यासाठी विविध योजना आखून त्या कार्यान्वित करणे हे होय. या योजना केंद्रसरकार, राज्यसरकार यांच्यामार्फत स्वतंत्रपणे किंवा दोन्ही सरकारांच्या समन्वयाने राबविल्या जातात. कांही योजना स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत राबविल्या जातात. त्यापैकी भारतातील तसेच महाराष्ट्र राज्यातील कांही योजना आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. बचत लॅम्प योजना (२००९) २. केंद्रसरकारची आरोग्य योजना (१९५४) ३. दीनदयाळ दुर्बल पुर्नवसन योजना (२००३) ४. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना (२०१५) ५. डिजीटल इंडिया प्रोग्राम (२०१५) ६. ग्रामीण भंदरण योजना (२००७) ७. इंदिरा आवास योजना (२०१०) ८. इंदिरा गांधी मातृत्त्व सहयोग योजना (२०१०) ९. एकात्मिक बाल विकास सेवा (१९७५) १०. एकात्मिक बालविकास कार्यक्रम (१९७८) ११. जननी सुरक्षा योजना (२००५) १२. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युवल मिशन (२००५) १३. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (२००४) १४. इन्स्पायर प्रोग्राम - डिपार्टमेंट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी इंडिया १५. किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना (१९९९) १६. पशु विमा योजना (१९९९) १७. महात्मा गांधी नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी ॲक्ट (२००६) १८. मेंबर ऑफ पार्लमेंट लोकल एरिया डेव्हलपमेंट स्कीम (१९९३) १९. मध्यान्ह भोजना योजना (१९९५) २०. राष्ट्रीय साक्षरता अभियान (१९८८) २१. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना (१९९५) २२. प्रधानमंत्री जनधन योजना (२०१४) २३. राजीव आवास योजना (२०१३) २४. राष्ट्रीय कृषि विकास योजना (२००७) २५. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना (२००८) २६. राजीव गांधी स्कीम फॉर एम्पॉवरमेंट ऑफ ॲडोलसन्ट गर्ल्स (२०११) २७.संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२००१) २८. स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना (१९९९) २९. अटल पेन्शन योजना (२०१०) ३०. राष्ट्रीय अन्नसुरक्षा

ISSN - 2278-9308

अभियान (२००७) ३१. अन्त्योदय अन्न योजना (२०००) अशा प्रकारच्या अनेक योजना केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामार्फत राबविण्यात आल्या आहेत.

**कल्याणकारी योजनांचे मुल्यमापन -**

केंद्रसरकार तसेच विविध राज्यसरकारे यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी कार्यक्रमांचे मुल्यमापन करीत असतांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे या योजनाकडे केवळ नकारात्मक दृष्टिकोणातून न बघता काही योजनांचे व्यावहारिक उपयुक्तता मुल्य अद्वितिय आहे. वर्ष २००० मध्ये सुरु करण्यात आलेली अन्त्योदय योजना ही भारतातील गरीबांमधील अति गरीबांसाठी राबविण्यात आली. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अंत्योदय शिधापत्रिकांचे वाटप करुन त्यावर ३५ किलो धान्य नाममात्र दराने देण्याची ही योजना आहे. २००३-०४ या वर्षापासून १ कोटी लोकांसाठीची योजना ही आणखी भारतातील ५० लाख लोकांसाठी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र अशा प्रकारची योजना राबवितांना त्याच्या अंमलबजावणीत अनेक दोष निर्माण होतात. अंत्योदयाची शिधापत्रिका मिळविण्यासाठी लोक प्रचंड धडपड करतात. आपल्याजवळ ही शिधापत्रिका असणे म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. म्हणजे लोक गरीबीकडून अतिगरीब होण्यासाठी अधिक धडपड करतांना दिसतात की काय असा प्रश्न निर्माण व्हावा अशी ही योजना आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना अशा प्रकारची रोजगार हमी योजना ही अगोदर महाराष्ट्रात सुरु करण्यात आली आणि नंतर ती सुधारित स्वरुपात भारतात लागु करण्यात आली. या योजनेत अनेक दोष, उणिवा आहेत. मात्र ही योजनाच बंद न करता त्यातील दोष दूर करणे आवश्यक आहेत. त्यातून पाणीपुरवठयासारख्या दीर्घकालीन नालाबंडिंग, रस्ते, धरणे यांची निर्मिती होणे आवश्यक आहे.

ज्या लोकांची काम करण्याची कुवत नाही, जे दुबळे आहेत, असहाय्य आहेत, वृध्द आहेत, निराधार आहेत, त्यांच्याजवळ उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, दीर्घ आजारपण आहे, कॅन्सर, एडस् सारख्या असाध्य आजाराने पिडीत आहेत, अपंग आहेत, मतिमंद आहेत, शारीरिक दृष्टया सक्षम नाहीत अशा लोकांसाठीची ही योजना निश्चितच करुणेचे उत्तम उदाहरण आहे. श्रावणबाळ योजना ही सुध्दा अशीच एक योजना उत्तम योजना आहे. पशुविमा, राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना या देखील लोकांना तात्पुरती मदत करणाऱ्या आहेत.

शाळेतील मुलांसाठी राबविण्यात येणारी मध्यान्ह भोजन योजना जी १९९५ मध्ये सुरु करण्यात आली ती दुर्गम, आदिवासी भागात, शहरांमधील झोपडपट्टी, गलिच्छ वस्त्यांमध्ये निश्चितच फायद्याची आहे. कांही शहरांमध्ये गुन्हेगारीकडे वळलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी निश्चितच ती संजीवनी आहे.

**करुणेकडून स्वावलंबनाकडे जाण्याची गरज -**

बाबा आमटे म्हणतात दान माणसाला नादान बनवते. करुणेचे तत्त्वज्ञान लाचारांचे तांडे निर्माण करते. स्वाभिमानी समाज निर्माण करीत नाही.

नित्शेचा झोराष्ट्रस म्हणतो, दोन शिखरांना जोडणारा मनुष्य हा एक दोर आहे. एका शिखरावर आहे पशू आणि दुसऱ्या शिखरावर परमेश्वर. खाली प्रचंड खाई आहे. अतिमानव एका झेपेत हे अंतर कापण्याचा प्रयत्न करतो.

KOLHAPUR COMMERCE & NIGHT COLLEGE



सामर्थ्य, सौंदर्य आणि सुख या पलिकडे दुसरी मुल्ये त्याच्याजवळ नाहीत. जगातली दुर्बलता, कुरुपता त्याला नकोशी वाटतात, तो दुःखाकडे तुच्छतेने पाहतो व करुणेचा धिक्कार करतो. करुणेच्या सुगंधी मिठीत इतरांना घेऊन पुढे जाणारी वाटचाल मात्र कधी फिरत नाही. स्वतःच्याच कुजण्याची जेव्हा स्वतःला घाण येऊ लागते तेंव्हा ती असह्य असते आणि अशा वेळी करुणेची एखादी सुगंधी मिठी नशिबी असतेच असे नाही.

तेंव्हा अशा वेळी करुणेतून निष्क्रियता येणार नाही, लोकांमध्ये लाचारीची भावना निर्माण होणार नाही, त्याबरोबरच श्रम करणाऱ्याला व त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होईल, त्याला करुणेची गरज भासणार नाही, तो आपल्या कर्तृत्त्वाच्या जोरावर जगण्याचा प्रयत्न करेल, लाचार होणार नाही असा सुवर्णमध्य काढणे हीच कल्याणकारी राज्याची खरी गरज आहे. तेंव्हा त्याचा अतिरेक न करता किंवा तुच्छ न लेखता ते एक साधन आहे याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

**समारोप सारांश -**

भारतीय सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात करुणेला महत्त्वाचे स्थान आहे. लोककल्याणकारी राज्याची निर्मिती करीत असतांना भारतातील जे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासलेले समाजसमूह आहेत, जाती आहेत, विविध गट आहेत त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे हे राष्ट्राचे कर्तव्य ठरते. त्या दृष्टीकोणातूनच केंद्रसरकार, राज्यसरकार व केन्द्रशासित प्रदेशातील सरकारांना प्रयत्न करावे लागतात. इतकेच नाही तर स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिका यांनाही प्रयत्न करावे लागतात. धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करावी लागते.

मात्र अशा प्रकारच्या योजनांचा परिणाम हा देशाला नकारात्मक पध्दतीने होऊ नये याची काळजी शासनाने घ्यावी लागते. अन्यथा त्यातून समाजाचा विकास होण्याऐवजी समाज आळशी, निष्क्रीय होण्याचा धोका संभवतो.

अंत्योदयसारख्या योजनेतून मिळणारे लाभ अतिमागासवर्गासाठी त्याच्या उन्नतीसाठी फायदेशीर ठरत असले तरी ते प्रतिष्ठित बनता कामा नये. अन्यथा लोक दरिद्री राहण्यामध्येच धन्यता मानण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**संदर्भ -**

१. केंद्रशासनाच्या विविध वेबसाईटस्.
२. राज्यशासनाच्या विविध योजना संदर्भातील वेबसाईटस्.
३. बाबा आमटे "ज्वाला आणि फुले" प्रकाशक, रसिक आंतरभारती, पुणे.
४. दत्तप्रसाद दाभोळकर "शोध स्वामी विवेकानंदांचा" मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ पुणे - ३०.
५. दत्तप्रसाद दाभोळकर, विज्ञानेश्वरी, राजहंस प्रकाशन, पुणे.
६. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : लेखसंग्रह, वैदिक संस्कृतीचा विकास.
७. सुविरा जयस्वाल : Caste ३ Origin, Function and Dimensions of Change, १९९८ New Delhi.



अर्थशा
प्रस्तावन
लोकसं
आधुनि
साक्षरते
लोकसं
अवलं
लोकसं
या नि
लोकस
प्रकिये
अवधे
काढल
महार
अर्था
11 1
230
साक्ष
प्रत्ये
जे.
त्या
अधि
याम
मह
त्य
का
नि
आ
Pe